N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** मुरगुड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0012 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**20/01/2026 04:51

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 19/01/2026

**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/01/2026

**Time From (वेळेपासून):** 15:22 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:19 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 19/01/2026 **Time (वेळ):** 18:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/01/2026 04:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मुरगुड ,ताकागल

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजेंद्र अशोक सानप

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** अशोक सानप

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुरगुड,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुरगुड,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8208971207

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रदिप पांडूरंग देसाई | | वडील का नाम : पांडूरग देसाई | 1. शामिनचे खुर्द, ,ताभुदरगड, मुरगुड,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रु दराच्या 80 भारतीय चलनी नोटा | 40,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

40,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 20/01/2026

मी राजेंद्र अशोक सानप, वय 40 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8208971207 समक्ष मुरगुड पोलीस ठाणेस जि.कोल्हापूर येथे हजर राहुन फिर्याद देतो की,

दिनांक 19/01/2026 रोजी आम्ही कार्यालयात हजर असताना, तक्रारदार श्री.सुनिल शंकर हारगे, व्यवसाय -गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर, रा. बसव संकुल, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर त्यांचे मो.नं. 8624498411 वरून 12.00 वा.चे सुमारास माझे मोबाईल फोनवर फोन करून त्यांच्याकडे प्रदिप पांडूरंग देसाई, वय-32 वर्षे, पद- नगर अभियंता (स्थापत्य), नगर परिषद मुरगुड, ता.कागल तत्कालीन नेमणुक हुपरी नगर परिषद हुपरी हे तक्रारदार यांचे एम.बी. रजिस्टर मधील नोंदी पुर्ण करून देणेसाठी लाच मागणी करत असल्याचे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार हारगे यांना फोन करून, त्यांची तक्रार विचारली असता, त्यांनी थोडक्यात तक्रार सांगितली की, मी वरील ठिकाणी राहणेस असून मी गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर म्हणुन काम करीत असुन गव्हर्मेंटचे रस्ते, गटर व इतर बांधकामाची ई निविदा भरून प्राप्त करीत असतो. त्याप्रमाणे मी तसेच माझे पार्टनर प्रतापराव गोविंदराव जाधव, वय - 45वर्षे, रा.हुपरी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर असे आम्ही दोघांनी हुपरी नगरपरीषद, हुपरी ता.हातकणंगले जि.कोल्हापूर यांचेकडील ई निविदा रस्ते अनुदान माध्यमातून हुपरी नगरपरीषद हद्दीतील अंतर्गत रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे असे काम ई निविदेतून दिनांक 05/02/2025 रोजी वर्क ऑर्डर होवून सदरचे काम आम्हास प्राप्त झाले होते सदरचे काम आम्ही मार्च 2025 पर्यत पुर्ण केले, त्यानंतर सदरचे कामाचे मोजणी पुस्तकात आम्ही केले कामाच्या नोंदी पुर्ण करून आमचे वर्क ऑर्डर प्रमाणे होणारे बिल मंजूर झाले की नाही हे पाहणेकामी मी हुपरी नगर परीषद येथे गेलो असता त्यावेळी आमचे कामाचे मोजणी पुस्तकाचे नोंदी नगर अभियंता प्रदीप देसाई यांनी पुर्ण केली नसलेचे व त्यांची हुपरी नगर परीषद ते मुरगुड नगर परीषद अशी बदली झालेचे समजले. मी नगर अभियंता प्रदीप देसाई यांना मुरगुड नगर परीषद येथे जावुन भेट घेतली असता त्यांनी मला केले कामाचे मोजणी पुस्तकातील नोंदणी पुर्ण करून देणेकरीता माझेकडे 1,50,000/- रूपये लाच रकमेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना जून 2025 मध्ये माझा मुलगा शर्विल हारगे यांचे मार्फतीने 50,000/- रूपये लाच रक्कम दिली होती. त्यानंतर दिनांक 26/12/2025 रोजी भेटलो असता, नगर अभियंता प्रदीप देसाई यांनी माझे हुपरी येथील केले कामाचे मोजणी पुस्तक पुर्ण करून देणेसाठी माझेकडे उर्वरित 1,00,000/- रूपये दिले की आपणास लगेच मोजणी पुस्तक पुर्ण करून देतो असे सांगितलेने, मी मुरगुड नगर परीषद येथील नगर अभियंता प्रदीप देसाई यांना पैशांची जुळणी करून आपणास भेटतो असे सांगुन निघून आलो होतो. परंतु मुरगुड नगर परीषदेचे नगर अभियंता प्रदीप देसाई यांनी मला त्यांचे मागणीप्रमाणे शिल्लक राहिलेली 1,00,000/- रू रक्कम ही लाच रक्कम म्हणुन मागणी करीत असलेची माझी खात्री झाली आहे. मला त्यांचे मागणीप्रमाणे 1,00,000/- रू. लाच रक्कम देणेची ईच्छा नाही. यापुर्वी मुरगुड नगरपरीषदेचे नगर अभियंता प्रदीप देसाई यांचेशी माझे कोणतेही देवाण घेवाणीचे व्यवहार नाहीत. तसेच माझा आणि त्यांचा कोणताही वाद नाही. मी आज दिनांक 19/01/2026 रोजी प्रदीप देसाई यांना मुरगुड नगर परिषद येथे भेटण्यास जाणार असुन त्यांचेवर आपणा कडुन कारवाई व्हावी ही विनंती म्हणुन तक्रार सांगितली.

त्यावेळी तक्रारदार यांनी आम्हास तुम्ही देवगड-निपाणी राज्यमार्गावरील येमगे गावचे पुढे रस्त्याचे कडेला मोकळया जागेत या, तेथे मी तुम्हाला भेटुन माझा तक्रारी अर्ज देतो असे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार हारगे यांना त्यांनी सांगितले ठिकाणी 14.30 वा. चे सुमारास पोहचत असल्याचे सांगुन, तेथे त्यांना हजर राहणेस सांगितले. त्यानंतर मी लागलीच मा. अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक माध्यमिक, कोल्हापूर यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने दोन शासकीय पंच यांना दिनांक 19/01/2026 रोजी तात्काळ गोपनिय कामकाजाकरीता पाठवावे असे कळविले. दिनांक 19/01/2026 रोजी दुपारी 12.40 वा चे सुमारास दोन

शासकीय पंच 01) संदिप दिनकर पोवार, वरिष्ठ लिपीक, 02) संजय कृष्णा जरग, वरिष्ठ लिपीक असे हजर झाले. त्यानंतर आम्ही, सापळा पथकातील अंमलदार, शासकीय दोन्ही पंच असे सापळा कारवाई करीता आवश्यक असलेली सामुग्री घेवुन कार्यालयातील अमंलदार पो.हे.कॉ.संदिप काशीद, पो.हे.कॉ. सुधीर पाटील, पो.कॉ.कृष्णा पाटील असे शासकीय बोलेरो चार चाकी वाहनातुन अँन्टी ऑफिस कार्यालय कोल्हापूर, कळंबा मार्गे मुदाळतिट्टा येथून देवगड- निपाणी रोडने येमगे गावचे पुढे रस्त्याचे बाजूस तक्रारदार हे थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यावेळी तेथे तक्रारदार उपस्थित होते. त्यावेळी मी तक्रारदार हारगे यांना शासकीय पंच, स्टाफ यांचेशी ओळख करून दिली. त्यानंतर माझे सुचनेवरून तक्रारदार हारगे यांनी वरीलप्रमाणे त्यांची तक्रार पंचाना सांगितली. त्यानंतर तक्रारदार हारगे यांनी त्यांचा तक्रारी अर्ज आमचेकडे दिला. तक्रारदार हारगे यांनी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व दोन्ही पंचांनी तक्रारी अर्जावर सहया केल्या. तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार हारगे व पंच नं. 01 संदिप पोवार यांचेसह मुरगुड नगर परिषद मुरगुड येथे नगर अभियंता प्रदिप देसाई यांची भेट घेणेकरीता पाठवुन, हारगे यांचे तक्रारीप्रमाणे, त्यांचेकडे प्रदिप देसाई हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन,पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये झक्ड कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार हारगे व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार हारगे व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 15.22 वाजता चालु करून, तो तक्रारदार हारगे यांचे गळ्यात काळ्या दो-याच्या साहयाने अडकवुन, तक्रारदार हारगे व पंच नं.1 संदिप पोवार यांना नगर अभियंता प्रदिप देसाई यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार हारगे यांचे टाटा कंपनीचे नेक्सॉन क्रमांक एमएच 09 एफबी 0956 वरून पाठविले. त्यावेळी आम्ही सापळा पथक व पंच नं.02 संजय जरग आमचेकडील बोलेरो गाडीत थांबुन राहीलो. तक्रारदार हारगे व पंच नं.1 संदिप पोवार असे प्रदिप देसाई यांना भेटुन आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 16.00 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 संदिप पोवार यांना मुरगुड नगर परिषद मुरगुड येथे प्रदिप देसाई यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता, त्यांनी तक्रारदार हारगे यांचे सोबत मुरगुड नगर परिषद मुरगुड येथे गेलो. तेथे तक्रारदार हे प्रदिप देसाई यांना भेटले, त्यावेळी त्यांचेत तक्रारदार यांचे कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी तक्रारदार हारगे " आपल्याला आता तुम्ही काय म्हणला ते दीडच काय गणित बसणार नाही आपल्याला तुम्ही फक्त या कामात आता हे बिल कमी करून पेमेंट तुम्ही जरा हे कमी करा'' असे म्हणाले. त्यावेळी प्रदिप देसाई " करतो मी दहा हजार रूपये कमी करा" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार हारगे " अहो दहा हजार न आता किती कमी होणार हाय, आता ते दीड मध्ये दहा कमी " असे म्हणाले. त्यावेळी प्रदिप देसाई " मला त्रास खुप झालेला आहे "असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार हारगे " दीड लाखात दहा हजार म्हणजे एक लाख चाळीस हजार झाले साहेब" असे म्हणाले. त्यावेळी प्रदिप देसाई '' तुम्ही दहा लाखाचच काम केलय" असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार हारगे '' आता तुम्हाला मी पन्नास हजार रूपये दिले" असे म्हणाले, त्यावर प्रदिप देसाई '' लहान आवाजात बोला'' असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार हारगे '' आत्ता तुम्हाला किती करायच सांगा मला'' असे म्हणाले, त्यावर प्रदिप देसाई '' तुम्हाला सांगितल की परवा'' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार हारगे '' व्हय की मग त्यांच त्यांन सत्तर लाखाच्या हिशोबान त्यांना दयायच म्हणल्यावर, सात दुणे चैदा दीड लाख झाल दीड लाखात तुम्ही दहा हजार कमी म्हणालाय, त्यात काय तर कमी करा साहेब जरास'' असे म्हणाले, त्यावर प्रदिप देसाई '' नाही केल की मी दहा हजार मी त्या साठीच केलय, त्या आठ लाखच रेकॉर्ड करणार होत्या म्हणुन दहा हजार आपुण केलय, तस पंधरा कराय लागतय पण दहा हजार आपण केलय'' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार हारगे '' तुम्हाला किती दयायच नेमक''असे म्हणाले, त्यावर प्रदिप देसाई '' तुम्हाला सांगा नव्वद''असे म्हणाले, त्यावर तक्रारदार हारगे '' आता पन्नास हजार दिल्यात मी''असे म्हणाले, त्यावर प्रदिप देसाई 'ऐशी ऐशी दयायच हाईत बघा'' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार हारगे ''ऐशी हजार'' असे म्हणाले, त्यावर प्रदिप देसाई '' नव्वद मधन दहा कमी केले हो'' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार हारगे '' मला परवडायला पण पाहिजे हो साहेब, काय झालय माझ मशनरी गेल्यात, ते हुपरी तळंगदे च्या रस्त्यावर साहेब माझी दोन लाख रूपयाच नुकसान हाय साहेब'' असे म्हणाले, त्यावर प्रदिप देसाई '' तुमच्या लडतरीत माझी किती वाताहत झाली, मला किती वेळा कॉल करायला लागला मॅडमला, मला मिराला किती वेळा कॉल करायला लागला, सीओना किती कॉल करायला लागला'' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार हारगे '' आता किती एक चाळीस भर हजार देतो मी एकुण घ्या'' असे म्हणाले, त्यावर प्रदिप देसाई '' नाही नाही तस काय करू नका विषय संपवा आणि जावा, गेल्या वेळी ऐवढ पाया बिया पडला म्हणुन दिली तुम्हाला, जावा म्हणल आता तरी करू नकोसा'' असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी तक्रारदार

हारगे " लोन करून व्याज वाढालय साहेब , सत्तर ऐशी सत्तर लाखाच, बिलाच विचार करा, बर मी काय करतो चाळीस पाठवतो आणि एम.बी झाल्याव '' असे म्हणाले, त्यावेळी प्रदिप देसाई '' नाही नाही" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार हारगे " आणि एम बी झाल्याव एम बी घेवुन जाताना करतो की साहेब, आता चाळीस देतो हो " असे म्हणाले. त्यावेळी प्रदिप देसाई " करून जावा ना" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार हारगे " नाही आत्ता चाळीस देतो " असे म्हणाले. त्यावेळी प्रदिप देसाई "एम बी मॅडमच्याकड देणार " असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार हारगे '' मॅडमच्याकड दया, आत्ता चाळीस देतो तुम्ही एम बी मॅडमांच्याकड दया'' असे म्हणाले, त्यावेळी प्रदिप देसाई '' नाही नाही ती आज मॅडमच्याकड दयायाला लागल''असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार हारगे '' देवु नका मग दोन दिवस, काय करा पन्नास हजार आणि हे चाळीस म्हणजे नव्वद हजार पोचत्यात साहेब'' असे म्हणाले, त्यावेळी प्रदिप देसाई '' आता चाळीस घेवुन नंतर तुम्ही'' असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार हारगे '' हा नंतर मी आणि कस मी त्याला चाळीस अँडजस्ट करून आणलाय तेण आता, त्या यायला लागलाय, मी ते घेणार आणि येणार हं''असे म्हणाले, त्यावेळी प्रदिप देसाई ''एम बी देत नाही आज'' असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार हारगे '' ठिक हाय मी देतो चाळीस तेला पाठवुन आणि हे करतो हं'' असे म्हणाले, त्यावेळी प्रदिप देसाई ''चालतय'' असे म्हणाले. त्यानंतर मी व तक्रारदार हारगे तेथुन निघुन, आपले जवळ आलो आहे असे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार हारगे यांना प्रदिप देसाई यांना भेटण्यास गेले नंतर काय हकीकत घडली याबाबत विचारले असता, त्यांनी पंच नं. 1 संदिप पोवार यांचे हकीकतीस मिळतीजुळती हकीकत सांगितली.

त्यानंतर पंच संदिप पोवार व तक्रारदार हारगे यांचेकडुन हकीकत ऐकुण व्हाईस रेकॉर्डमधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता, तक्रारदार हारगे यांचेकडे प्रदिप देसाई यांनी तक्रारदार यांनी हुपरी नगर परिषद हुपरी ई-निविदा अंतर्गत मिळालेले तक्रारदार यांनी केलेल्या कामाचे एम.बी रजिस्टरचे काम पुर्ण करून देणेसाठी तक्रारदार यांचेकडे एकुण १ लाख 50 हजारांची मागणी करून तडजोडी अंती १ लाख ३० हजार रुपये मागणी केली. त्यापैकी यापुर्वी 50 हजार स्वीकारलेचे मान्य करून राहिलेल्या 80 हजारामध्ये आता तक्रारदार यांच्याकडे पहिला हप्ता म्हणून ४० हजार रूपये लाचेची मागणी केली तसेच राहिलेले 40 हजार रूपये लाच एम.बी रजिस्टर पूर्ण झाल्यावर घेणेचे मान्य केलेचे निष्पन्न झाल्याने आम्ही मुरगुड नगर परिषद मुरगुड येथे काम करणारे नगर अभियंता प्रदिप देसाई यांचे लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरू केली.

सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही सर्वांना सर्व सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार हारगे यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/-रू. दराच्या 80 भारतीय चलनी नोटा अशी 40,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार हारगे व पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व, संपुर्ण कार्यवाही, तसेच त्याअनुषंगाने तक्रारदार हारगे व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर अँथ्रासिन लावलेले 40,000/- रूपये तक्रारदार यांचे पॅन्टचे उजवे बाजुच्या पुढील खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार हारगे, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच तक्रारदार हारगे यांना मुरगुड नगर परिषद मुरगुड येथे काम करणारे नगर अभियंता प्रदिप देसाई यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांनी त्यांचे पॅन्टचे खिशातील हातरूमाल खिशातुन काढून तोंडावरून पुसुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 16.58 वाजता सुरू करून, तो तक्रारदार हारगे यांचे शर्टचे आतमध्ये काळे दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार हारगे व पंच नं.1 संदिप पोवार असे त्यांचे टाटा नेक्सॉन कार मधून आम्ही थांबलेल्या देवगड-निपाणी रोडला येमगे गावचे जवळ रस्त्यापासून मुरगुड नगर परिषद मुरगुड येथे निघाले. त्यावेळी त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.2 संजय जरग असे आमचेकडील शासकीय बोलेरो चारचाकी वाहनातुन तक्रारदार यांचे पाठोपाठ मुरगुड नगर परिषद मुरगुड जवळ आलो. त्यावेळी तक्रारदार हारगे व पंच नं.1 संदिप पोवार असे नगर परिषद मुरगुड कार्यालयाचे बाजूस कार पार्क करून नगर परिषद कार्यालयात गेले. आम्ही नगर परिषद मुरगुड कार्यालयाचे आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. त्यानंतर तक्रारदार हारगे व पंच नं.01 पोवार व प्रदिप देसाई हे नगर परिषद कार्यालयाचे बाहेर येवुन तेथून चालत नगर परिषदेच्या बाजूस असले एसटी स्टॅण्ड मुरगुड कडे चालत गेले, त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 02 जरग व सापळा पथकातील अंमलदार गेलो, त्यावेळी तक्रारदार हारगे, पंच नं.01 पोवार व नगर अभियंता प्रदिप देसाई असे एसटी स्टॅण्ड आवारात पार्किंग केलेल्या कार जवळ गेले व तेथून परत नगर परिषद आवारात आले, त्यावेळी तक्रारदार हारगे यांनी नगर परिषद मुरगुड कार्यालय, मुरगुड येथे काम करणारे प्रदिप देसाई यांनी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता मी, पंच नं.02 संजय जरग व स्टाफ तेथे गेलो. तक्रारदार हारगे यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर 17.19 वाजता बंद करून, नगर अभियंता प्रदिप देसाई यांना पकडले व एसटी स्टॅण्ड आवारात पार्किंग केलेल्या हुंदाई आय 10 कार नं.एमएच 03 बीजे 4706 या कारच्या समोरील डॅशबोर्ड मधून लाच

रक्कम पंच नं.02 जरग यांच्यामार्फत ताब्यात घेतली. त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच यांना सापळा कारवाईवेळी काय हकीकत घडली असे विचारले असता, त्यांनी सांगितले की, तक्रारदार हारगे व प्रदिप देसाई हे हारगे यांचे कामाचे अनुषंगाने बोलले. त्यावेळी प्रदिप देसाई हे तक्रारदार हारगे यांना "मी अनलॉक करतो गाडीत ठेवा" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार हारगे हे '' हे तुमच्या खिशात ठेवतो की'' असे म्हणाले, त्यावेळी प्रदिप देसाई '' नको गाडीत ठेवा, तिथ हाय बघा निळी गाडी पांढ-या गाडीच्या पलीकड'' असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार हारगे ''ही...'' असे म्हणाले, त्यावेळी प्रदिप देसाई '' पांढ-या गाडीच्या पलीकड, अनलॉक केलोय बघा ही...'' असे म्हणाले, त्यावेळी तक्रारदार हारगे '' तुमच्याकड घ्या की ते...'' असे म्हणाले, त्यावर प्रदिप देसाई '' नको इथ नको ठेवुन या की, ठेवुन या की'' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार हारगे '' तिथ ठेवुन येवु काय''असे म्हणाले, त्यावर प्रदिप देसाई '' अनलॉक केलिया हं का''असे म्हणाले, त्यावर तक्रारदार हारगे ''हा...'' असे म्हणाले, त्यावर प्रदिप देसाई '' ड्रायव्हर साईटला ड्रावर ला ठेवा'' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार हारगे '' डिगीत ठेवु काय, ड्रावरला ठेवु काय... साहेब ओ साहेब... साहेब गाडीच्या डिग्गीत ठेवलय बघा'' असे म्हणाले, त्यावर प्रदिप देसाई '' हा...'' असे म्हणाले. त्यावेळी प्रदिप देसाई यांनी सांगितलेप्रमाणे तक्रारदार हारगे यांनी त्यांचे हुंदाई आय 10 कारचे समोरील साईटचे डॅशबोर्डचे ड्राव्हरमध्ये लाच रक्कम ठेवली व प्रदिप देसाई यांच्यासोबत चालत नगर परिषद कार्यालयाकडे येत असताना तक्रारदार यांनी प्रदिप देसाई यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतरचा नियोजीत इशारा केला असल्याचे सांगितले.

सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या. त्यावेळी प्रदिप देसाई यांना आम्ही त्यांचे नाव, पद व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव प्रदिप पांडूरंग देसाई, वय-32 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-नगर अभियंता (स्थापत्य) नगर परिषद मुरगुद वर्ग-2, रा.मिणचे खुर्द, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर असे असल्याचे सांगितले. सदर ठिकाणचे व्हिडीओ शुटींग पो.हे.कॉ काशीद यांनी केले आहे. सदर ठिकाणी तक्रारीचे अनुषंगाने आवश्यक असणारी तक्रारदार यांचे कामाचे एम.बी. रजिस्टर हे प्रदिप देसाई यांच्या हुंदाई कंपनीचे आय 10 कार मधून ताब्यात घेतले. सदरची निळ्या रंगाची हुंदाई आय 10 कार नं. एमएच 03 बीजे 4706 ही प्रदिप देसाई यांनी स्वतःचे मालकीचे असल्याचे सांगितले. त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही मुरगुड पोलीस ठाणे येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार श्री.सुनिल शंकर हारगे, व्यवसाय - गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर, 01/552 बसव संकुल, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी हुपरी नगर परीषद, हुपरी ता.हातकणंगले जि.कोल्हापूर यांचेकडील ई निविदा रस्ते अनुदान माध्यमातून रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे असे कामे ई निविदेतून दिनांक 05/02/2025 रोजी वर्क ऑर्डर होवून तक्रारदार हारगे यांना मिळालेली कामे त्यांनी पुर्ण केली होती. सदरचे कामाचे मोजणी पुस्तकात कामाच्या नोंदी पुर्ण करून तक्रारदार यांचे वर्क ऑर्डर प्रमाणे होणारे बिल मंजूर होण्यासाठी एम.बी.रजिस्टर मधील नोंदी पुर्ण करून देण्याकरीता प्रदिप पांडुरंग देसाई, नगर अभियंता, मुरगुड नगरपरिषद मुरगुड, तत्कालीन नेमणुक हुपरी नगर परिषद हुपरी यांनी तक्रारदार हारगे यांचेकडे तक्रारदार यांचेकडे एकुण १ लाख 50 हजारांची मागणी करून तडजोडी अंती १ लाख ३० हजार रुपये मागणी केली. त्यापैकी यापुर्वी 50,000/- रू स्विकारलेचे मान्य करून राहिलेल्या 80,000/- रूपयांपैकी पहिला हप्ता म्हणून ४०,०००/-रू लाच रक्कम तक्रारदार हारगे यांचेकडुन, बेकायदेशीरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारताना त्यांना आम्ही व सापळा पथकाने पकडले आहे. म्हणुन माझी प्रदिप पांडूरंग देसाई, वय-32 वर्षे, पद- नगर अभियंता (स्थापत्य), नगर परिषद मुरगुड, ता. कागल, जि.कोल्हापूर तत्कालीन नेमणुक हुपरी नगर परिषद हुपरी मुळ रा.मिनचे खुर्द, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द माझी फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून, तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

हा दिला जबाब स. ता. म.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

shivaji dhondiram kare(I (Inspector)) / DGPSDKM8605 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** ठाणे अंमलदार
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी) ...गूड पो. ठाणे, जि. कोल्हापूर

**Name** (नाव): shivaji dhondiram ka

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): DGPSDKM8605